# १५. आळाशी

**हनुमंत चांदगुडे** (१९७७) : प्रसिद्ध कवी व गीतकार. शेती, निसर्ग, ग्रामीण भाग व शेतकरी हे त्यांच्या लेखनाचे आवडते विषय. विविध साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंक यांसाठी कथा, कविता व ललितलेखन. अनेक चित्रपट व अल्बम यांसाठी गीतलेखन. याशिवाय त्यांचा 'काकरी' हा कवितांचा अल्बम प्रसिद्ध आहे. त्यांचा 'भेगा भुईच्या सांदताना' हा काव्यसंग्रह प्रकाशित असून या काव्यसंग्रहाला आजपर्यंत १७ पुरस्कार मिळाले आहेत.

शेतकऱ्यांच्या अपार कष्टातून नभालाही पाझर फुटतो. त्यांच्या परिश्रमाला पावसाच्या रूपाने फळ मिळते. भरघोस पीक यावे यासाठी शेतकरी पुन्हा पुन्हा रात्रंदिवस चिखलपाण्यात राबत असतात. त्यामधून पिकणाऱ्या अन्नधान्यावर जगाचे पालनपोषण होते. त्यामुळे आपण शेतकऱ्यांविषयी कृतज्ञ राहिले पाहिजे, हे या कवितेतून स्पष्ट होते. प्रस्तुत कविता 'भेगा भुईच्या सांदताना' या काव्यसंग्रहातून घेतली आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

बा अनवाणी पायाचा ठसा मातीत उठतो
भाळावरल्या घामाचा पान्हा नभाला फुटतो...

नभ पाणी पाणी होतो, माती चिखल होतीया
कुणब्याच्या जीवनाची मग उकल होतीया
भेगाळल्या भुईकडं बाप पाहून फाटतो
भाळावरल्या घामाचा पान्हा नभाला फुटतो...



हातापायाला चिखल बाप घामामधी ओला
पीक पाहून शिवारी थवा पाखरांचा आला
बाप आरोळी मारता तान्हा रडत उठतो
भाळावरल्या घामाचा पान्हा नभाला फुटतो...

बाप रगात होऊन रोज पाटातून व्हातो
मग कणसाचा जन्म तेव्हा ताटातून होतो
दाणे कणसाला येता बाप हुरडा वाटतो
भाळावरल्या घामाचा पान्हा नभाला फुटतो...

येता भरात जोंधळा बाप काढणी करतो
स्वत: राहून उपाशी पोट जगाचं भरतो
जातो आळाशी होऊन तरी 'आळा' का तुटतो?
भाळावरल्या घामाचा पान्हा नभाला फुटतो...





## स्वाध्याय

**प्र. १. खालील आकृती पूर्ण करा.**

पाऊस आल्यानंतर झालेले बदल
- ☐
- ☐

**प्र. २. हे केव्हा घडते ते लिहा.**

(अ) पाखरांचा थवा येतो..........

(आ) तान्हा रडत उठतो..........

**प्र. ३. कवितेतील शेतकऱ्याच्या कामाच्या कृतींचा ओघतक्ता तयार करा.**

अनवाणी पायाने उन्हाळ्यातले काम करणे.
↓
☐
↓
☐
|
अत्यंत मेहनतीने पाटातून शेतीला पाणी देणे.
|
☐
↓
जोंधळ्याची काढणी करणे.

**प्र. ४. कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधून लिहा.**

**प्र. ५. स्वमत लिहा.**

(अ) 'भाळावरल्या घामाचा पान्हा नभाला फुटतो' या ओळीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(आ) 'शेतकरी जगाचा पोशिंदा आहे' हे विधान तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

### गंमत शब्दांची

- **कणसाचा जन्म ताटातून होतो.**
- **आम्ही पाहुण्यांच्या जेवणासाठी ताट तयार केले.**

या दोन वाक्यांत 'ताट' शब्दाचे दोन अर्थ आलेले आहेत. याप्रमाणे काही शब्दांचे दोन किंवा अधिक अर्थ असतात. असे जास्तीत जास्त शब्द शोधा. त्यांचा भिन्न भिन्न अर्थ स्पष्ट करणारी वाक्ये लिहा. वर्गात वाचून दाखवा.

M3TPSC